दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १६४ वा शनिवार दि.२५ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# 'बाबासाहेबांचं नाव नको, पण आरक्षण पाहिजे', पडळकरांची नाव न घेता जरांगेंवर टीका

मुंबई, २५ नोव्हेंबर : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचा आरक्षणासाठी महाराष्ट्र दौरा सुरू आहे. तर दुसरीकडे धनगर समाजाने देखील आंदोलन सुरू केले आहे. अशातच धनगर समाजाचे नेते आणि भाजप आमदार गोपिचंद पडळकर यांनी जरांगे पाटील यांच्यावर अप्रत्यक्षरित्या गंभीर टीका केली आहे. 'आरक्षण मागताय तर बाबासाहेबांचं नाव का घेत नाहीत? असे म्हणत भाजपचे आमदार गोपीचंद पडळकरांनी नाव न घेता थेट मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीकास्त्र सोडलं आहे. याआधी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील यांच्यामध्ये वाक्युद्ध पेटलं होतं. आता पडळकर यांनीही जरांगे पाटील यांच्यावर टीका केल्यानंतर जरांगे पाटील काय उत्तर देतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. काय म्हणाले गोपिचंद पडळकर? भाजप आमदार गोपिचंद पडळकर म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला घटनेत आरक्षण दिले. त्यामुळेच आमचे एकच साहेब बाबासाहेब आहे. पण काही पुरोगामी म्हणून मिरवणाऱ्या नेत्यांनी निर्माण केलेले जातीयवादी माणूस आरक्षण मागतो पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सन्मान द्यायला व त्यांचे नाव घ्यायला तयार नाही. आम्ही आज बाबासाहेबांमुळे आहोत हे आम्ही मान्य करतो, असं विधान पडळकर यांनी केलं आहे. या टीकेनंतर मराठा क्रांती मोर्चाने पडळकरांना उत्तर दिलं आहे. पडळकरांनी मराठा आरक्षणाची उठाठेव करू नये, अन्यथा जशाच तसं उत्तर देवू मराठा आरक्षणाची गोपीचंद पडळकरांनी उठाठेव करू नये अन्यथा जशाच तसं उत्तर देण्याचा इशारा जालना मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक संजय लाखे पाटील यांनी दिलाय. मराठा समाज डॉ. बाबासाहेब आंबेकरांचं नाव






घ्यायला तयार नाही आणि यांना आरक्षण हवंय असं म्हणत अप्रत्यक्ष पडळकरांनी जरांगे पाटलांवर टीका केली होती. त्याला उत्तर देत पडळकर आधी धनगर बांधवांची फसवणूक करणं सोडून दिलं पाहिजे. कारण पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाला आरक्षण देण्याचं आश्वासन फडणवीसांनी दिलं होतं. आज शेकडो कॅबिनेट झाल्या आहेत. आधी फडणवीसांची गुलामगिरी करणं पडळकरांनी बंद करावं. त्याचबरोबर मनोहर भिडे गुरुजी यांचा एक चड्डी कार्यकर्ता असणारा गोपीचंद पडळकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर कधीपासून विश्वास आलाय. त्यामुळं मराठा समाजाच्या आरक्षणाची उठाठेव पडळकरांनी करून अन्यथा जशाच तसं उत्तर देण्यात येईल असा इशारा मराठा क्रांती मोर्चानं दिला आहे.

## खा.सुधाकर शृंगारे यांच्या संवेदनशीलतेने वाचले अपघातातील रुग्णांचे प्राण ..!

लातूर :- लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार सुधाकर शृंगारे आज सकाळी छत्रपती संभाजीनगर हून लातूर कडे येत असताना रस्त्यामध्ये केज शहराजवळ वाहनाचा अपघात झाल्याचे त्यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ त्यांची गाडी थांबवून अपघातात जखमी झालेल्यांना वाहन उपलब्ध करून देऊन हॉस्पिटलमध्ये पाठविले. आपल्या दानशूर वृत्तीमुळे आणि संवेदनशील स्वभामुळे ओळखल्या जाणाऱ्या खा.शृंगारे यांच्या संवेदनशीलतेमुळे या रुग्णांचे प्राण वाचले. खा.शृंगारे यांनी याप्रसंगी सबंधित पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा करुन अपघाताची नियमानुसार चौकशी करण्याबाबतचे निर्देश देखील दिले. तसेच अपघातातील जखमी झालेल्या नागरिकांची आस्थेने चौकशी करुन खा.सुधाकर शृंगारे यांनी अपघातग्रस्तांना आर्थिक



मदत केली आणि त्यांच्यावर वेळेवर योग्य ते उपचार करण्याबाबतच्या सूचना संबंधितांना देऊन जखमींना कोणत्याही प्रकारची मदत हवी असल्यास निःसंकोच होऊन माझ्याशी संपर्क करण्याचे आवाहन खा.सुधाकर शृंगारे यांनी याप्रसंगी अपघातग्रस्तांना आणि अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांना केले.

## डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लिज ओंकार शुगर्सकडून जिल्ह्यात सर्वाधिक उचल

निलंगा/प्रतिनिधीः- शेतकर्यांच्या आर्थिक स्थैर्याला व प्रगतीला प्राधान्य देत सुरु करण्यात आलेल्या डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लिज ओंकार शुगर्सकडून चालू गळीत हंगामासाठी गाळपास आलेल्या व येणार्या उसाला कारखान्याकडून प्रती टन २७०० रूपयांचा पहिला हप्ता जाहीर करण्यात आलेला आहे.जिल्ह्यात ही सर्वाधिक उचल आहे.ज्या शेतकर्यांनी ऊस गाळपास दिलेला आहे त्या शेतकर्यांच्या खात्यावर पहिला हप्ता जमा होण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी दिली आहे.

निलंगा तालुक्यातील अंबुलगा येथे डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना सुरु करण्यात आलेला होता. मात्र गेल्या अनेक वर्षापासून हा कारखाना बंद पडलेला होता. शेतकर्यांच्या हिताला प्राधान्य देत व त्यांना येणार्या अडचणी लक्षात घेऊन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी प्रयत्न करून हा कारखाना ओंकार शुगर्स यांच्या माध्यमातून सुरु केलेला आहे. कारखाना सुरु झाल्यानंतर आ. संभाजी पाटील निलंगेकर हा कारखाना केवळ शेतकर्यांच्या





हिताला आणि आर्थिक स्थैर्याला प्राधान्य देईल अशी ग्वाही देऊन या कारखान्यात कोणत्याही प्रकारचे राजकारणात करण्यात येणार नाही असा विश्वास दिला होता. आ. निलंगेकर यांनी आपला शब्द पाळत कारखाना विनाराजकारण यशस्वीपणे चालविण्यास कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांना मदत केलेली असून केवळ आणि केवळ शेतकर्यांचे हित जोपासण्याचे प्रयत्न या माध्यमातून केलेले आहेत. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लिज ओंकार शुगर्सचा आता दुसरा गळीत हंगाम सुरु झालेला असून कारखान्याला ऊस देणार्या शेतकर्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे कारखाना जास्तीत जास्त ऊस गाळप करत असून ज्या शेतकर्यांनी गाळपास ऊस दिला आहे व आगामी काळातही देणार आहेत त्या शेतकर्यांच्या ऊसास प्रती टन २७०० रूपयांचा पहिला हप्ता जाहीर करण्यात आलेला आहे. तसेच सदर रक्कम ऊस दिलेल्या शेतकर्यांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात झालेली आहे. कारखान्याचा चालू गळीत हंगाम प्रतिकुल परिस्थितीत देखील यशस्वीपणे पार पाडण्यासाठी चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील व कारखाना प्रशासन प्रयत्नशील असून कारखान्याच्या माध्यमातून अधिकाधिक ऊसाचे गाळप वेळेवर होईल असा विश्वास आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिलेला असून कारखाना यशस्वीपणे चालविण्यासाठी व शेतकर्यांचे हित साधण्यासाठी जास्तीत जास्त ऊस उत्पादक शेतकर्यांनी कारखान्यास ऊस पुरवठा करावे असे आवाहन केलेले आहे.

## विलास साखर कारखान्याचे २० दिवसात १ लाख मे.टन ऊसाचे गाळप पुर्ण











लातूर/ प्रतिनिधी : - लातूर जिल्हातील सर्वांगीण विकासात महत्वाचे योगदान असलेल्या विलास सहकारी साखर कारखाना युनीट १, वैशालीनगर,निवळी या कारखान्याने चालू गळीत हंगामात प्रती दिवस ५००० मे.टन ऊस गाळप करून २० दिवसात १,००,००० मे.टन ऊस गाळप करून ऊस गाळपाचा उच्चांक केला आहे. विलास साखर कारखान्याने मागील ऑफ सिझन काळात मशिनरी आधुनिकीकरणाची कामे हाती घेवून ४ महिन्याच्या आत संपूर्ण आधुनिकीकरणाचे कामे पूर्ण करून नियोजित वेळेत कारखाना ऊस गाळपासाठी सज्ज करून आधुनिकीकरणानंतर सध्या ५००० मे.टन प्रती दिन ऊस गाळप सुरू आहे. तसेच को-जनरेशन प्रकल्पातून ९.८ मे. वॅट प्रती तास प्रमाणे विक्रमी वीज निर्यात सुरू आहे. त्याचप्रमाणे डिस्टीलरी प्रकल्प पुर्ण क्षमतेने सुरू आहे. सुरू असलेल्या गळीत हंगामात ऊसतोडणी यंत्रणेचा व तांत्रिक कार्यक्षमतेचा प्रभावी वापर करून कारखाना विना स्टॉपेज वेगाने दैनंदीन गाळप करीत आहे. या गळीत हंगामात विलास सहकारी साखर कारखाना युनीट १ कडून आजअखेर १,००,००० मे.टन ऊसाचे गाळप करुन ८५,००० क्विंटल शुभ्र दाणेदार साखरेचे उत्पादन केले आहे. तसेच आजचा दैनिक साखर उतारा ११.१० टक्के आहे. माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रियमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या पुढाकारातून, सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या नियोजनाने लातूर जिल्हयाच्या विकासासाठी सहकार आणि साखर उदयोगाची सुरूवात झाली. शेतकऱ्यांच्या सेवेसाठी उभा राहीलेल्या या सर्व संस्था यशस्वीपणे वाटचाल करीत आहेत. ही वाटचाल माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली व लातूर ग्रामिणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या साखर कारखान्यामार्फत ग्रामिण भागाचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. शेतकऱ्यांशी बांधीलकी ठेऊन कारखान्याची वाटचाल चालू असल्यामुळे साखर कारखानदारीतील अनेक ऊस गाळप आणि ऊसदराचे उच्चांक प्रस्तापित झाले आहेत. आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची प्रेरणा, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शन व संस्थापक चेअरमन, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामिणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांचे नेतृत्वाखाली विलास सहकारी साखर कारखान्याने उच्चांकी ऊस दर अदा करण्याची परंपरा निर्माण केली आहे. चालू गळीत हंगामात देखील उच्चांकी ऊस दर देण्याची परंपरा कायम राखली जाणार असल्याची माहिती कारखाना व्यवस्थापनाने दिली आहे. चालु गळीत हंगामात उच्चांकी अंतिम दर देण्यात येणार असून जास्तीत जास्त ऊस पुरवठा करणेबाबत विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन रविंद्र काळे व कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी आवाहन केले आहे.

## विकसित भारत संकल्प यात्रा लातूर शहरांमध्ये सुरू




लातूर :- भारत सरकार तर्फे आयोजित करण्यात आलेली विकसित भारत संकल्प यात्रा आजपासून लातूर शहरामध्ये चालू करण्यात आली. याअंतर्गत शासनाकडून केंद्रशासनाच्या विवीध योजनांची माहिती असलेली डएऊ चेलळश्रश ींरप प्राप्त झाली आहे. सदरील यात्रा शहरात दि.२५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत शहरातील विवीध भागात जावून केंद्रशासनाच्या योजनांची माहिती दिली जाणार आहे व तसेच योजनेचा लाभ मिळण्यास अडचणी येत असल्यास अश्या नागरिकांना योग्य मार्गदर्शन केले जाणार आहे. सदरील वाहनाद्वारे आज इंडिया नगर, जुना रेणापूर नाका, केशव नगर, दीपज्योती नगर, सोहेल नगर या भागात जनजागृती करण्यात आली. वाहनासोबत मनपाच्या कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विकसित भारत संकल्प यात्रेच्या मार्गदर्शक सूचनानूसार आज आयुष्मान कार्डचे शिबीर आयोजित करण्यात आले होते. याअंतर्गत ८०० नागरिकांचे आयुष्मान कार्ड काढून देण्यात आले.

## संपादकीय....


# वाघांचा वानप्रस्थ!

ऐन उमेदीच्या काळात वलयांकित आयुष्य जगणाऱ्याला आयुष्याच्या उत्तरार्धात एकाकीपणाला सामोरे जावे लागणे ही मानवी जीवनात तशी सामान्य बाब. वाघ वाढले यात आनंद मानण्याचे दिवस सरून त्यांचे आयुष्य सुखकर कसे होईल या दृष्टीने विचार करण्याची वेळ माया व बजरंगमुळे आली आहे. ऐन उमेदीच्या काळात वलयांकित आयुष्य जगणाऱ्याला आयुष्याच्या उत्तरार्धात एकाकीपणाला सामोरे जावे लागणे ही मानवी जीवनात तशी सामान्य बाब. एखाद्याचे असे एकाकीपणात जगणे समोर आले की समाजमन हळहळते. अनेकदा याचा उलगडा त्याच्या मृत्यूनंतरच होतो. तेव्हा या हळहळीची तीव्रता अनेकदा अनुभवास येते. काही वर्षांपूर्वी परवीन बाबीचा झालेला मृत्यू किंवा अगदी अलीकडे रवींद्र महाजनींना आलेले मरण ही त्यातली प्रातिनिधिक ठरावी अशी उदाहरणे. हे मानवाच्या बाबतीत होते तसेच प्राण्यांच्या बाबतीतही घडते का? घडले तर आपण त्याकडे कसे बघतो? असे व्हायला नको होते यापलीकडे आपल्या प्रतिक्रिया कधी जातात का? मानव असो वा प्राणी, कुठल्याही सजीवाच्या बाबतीत हे घडायला नको यासाठी आपल्याकडून कृतीपर हालचाली होतात का? काया, वाचा, मन असलेल्या मानवाच्या व्यक्तिगत आयुष्यात कशाला डोकवायचे असे म्हणत त्याच्या एकाकी जगण्याकडे दुर्लक्ष करणे एखादवेळी समजून घेता येईल, पण फक्त काया व मन असलेल्या प्राण्यांच्या बाबतीत ही भूमिका योग्य कशी ठरू शकते? हे सारे प्रश्न उपस्थित झालेत ते ताडोबातील 'माया'च्या बेपत्ता होण्याने. पर्यटकांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेली ही वाघीण गेले तीन महिने दिसेनाशी झाली आहे. वन कर्मचाऱ्यांनी शोधमोहीम सुरू केल्यावर तिच्या अधिवासात हाडांचा सांगाडा मिळाला. तो तिचाच असल्याची चर्चा सुरू झाली. डीएनए चाचणीनंतर याचा उलगडा होईलच, पण यानिमित्ताने वाघांच्या वृद्धत्वाचा मुद्दा प्रकर्षाने समोर आला. २०१० पासून पांढरपवनी अधिवासात राहून लाखो पर्यटकांच्या 'दिला'चा ठाव घेणाऱ्या वलयांकित मायाचे हरवणे आयुष्याच्या उतारवयातील एकाकी जगण्याची जाणीव करून देणारे, चटका लावणारे आणि त्यासोबतच अनेक प्रश्न उपस्थित करणारे. वार्धक्यात असे विजनवासी जिणे कुणाच्याही वाटय़ाला येऊ नये ही भावना तशी सार्वत्रिक. म्हणूनच वृद्धांची काळजी, त्यांचे संगोपन यासाठी झटणाऱ्यांची संख्याही अलीकडच्या काळात वाढत चालली आहे. केवळ माणूसच नाही तर पाळीव प्राण्यांच्या बाबतीतही समाजात सजगता आली आहे. अशांचे मरण तरी किमान सुखकर व्हावे हाच यामागचा हेतू. त्याच न्यायाने वाघ व अन्य प्राण्यांकडेही बघायला हवे असा संदेश मायाच्या विषयाने साऱ्यांना दिला आहे. अवघे तेरा ते सोळा वर्षांचे आयुर्मान असलेल्या वाघांना उतारवयात अनेक संकटांचा सामना करावा लागतो. शिकारीची क्षमता गमावून बसलेला, सारी गात्रे शिथिल झालेला हा रुबाबदार प्राणी पोटाची भूक शमवण्यासाठी वणवण भटकत असतो. कुठे तरी आश्रय मिळेल या आशेवर जगत असतो. अशा स्थितीत त्याला काय हवे ते बघणे, त्याला शिकार मिळेल की नाही हे बघणे, त्याच्यावर सतत देखरेख ठेवणे हे काम व्याघ्र प्रकल्पांच्या व्यवस्थापनांचे. त्यात थोडी जरी कुचराई झाली की या मुक्या प्राण्याच्या एकाकी जगण्यातील संकटाच्या छटा आणखी गडद होत जातात.मायाच्या अधिवासात सांगाडा सापडण्याच्या दोन दिवस आधी याच ताडोबा परिसरात खडसंगीजवळ बजरंग या वृद्ध वाघाचा मृतदेह आढळला. चौकशीतून कळले की तो त्याच परिसरात 'छोटा मटका' या नावाने परिचित असलेल्या वाघाने केलेली शिकार खायला गेला होता. त्यातून दोघांत झुंज झाली व बजरंगला जीव गमवावा लागला. वन खात्याने या मृत्यूची नोंद 'अधिवासासाठी लढाई' अशी केली आणि बजरंगच्या मृत्यूवर पडदा टाकला. वृद्ध वाघांच्या बाबतीत हे घडतेच. पण शेवटी हा निसर्गचक्राचा नियम, त्याला कोण काय करणार असा पवित्रा घेत किती काळ स्वस्थ बसायचे? वाघ हा जंगल पर्यटनाच्या साखळीतला अतिशय महत्त्वाचा घटक. या पर्यटनाचा अख्खा डोलाराच त्याच्या 'दिसण्या'वर उभा असेल तर वृद्धापकाळात त्याची विशेष काळजी घेणे सरकारचे कर्तव्य ठरत नाही काय? जसे वय झालेल्या माणसांना आपण जास्त हालचाल करू देत नाही, त्यांना दगदग व्हायला नको याची काळजी घेतो, तशी या प्राण्यांच्या बाबतीत घ्यायला काय अडचण आहे? अशा वृद्ध वाघांच्या संदर्भात राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरणाच्या विशेष सूचना नाहीत. मात्र अशा वाघांच्या अधिवासातले पर्यटन नियंत्रित करावे, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. त्याचे पालन खरोखर होते का? असे वय झालेले वाघ एकाकी पडतात. अगदी वृद्ध व्यक्तींसारखेच. त्यामुळे त्यांना आणखी त्रास व्हायला नको याची काळजी घेतली जाते का? एकांतवास व एकाकीपणा यात फरक आहे. तो जाणून घेतच या प्राण्यांच्या व्यवस्थापनाकडे लक्ष द्यायला हवे ही भावना अजूनही सरकारी पातळीवर रुजली नाही हेच या घटना दाखवून देतात. वाघ वाढले यात आनंद मानण्याचे दिवस आता सरले. आता गरज आहे ती त्यांचे आयुष्य सुखकर कसे होईल हे बघण्याची. त्या दृष्टीने विचार करण्याची वेळ माया व बजरंगमुळे आली आहे. उण्यापुऱ्या साडेतेरा वर्षांच्या आयुष्यात पाच वेळा प्रसवलेल्या मायाने तीन वेळा मानवांवर हल्ले केले. त्यात ठार झालेले तिघेही वन कर्मचारी होते. शासकीय कर्तव्य बजावण्याच्या प्रयत्नात हे तिघे तिच्याजवळ गेले व जीव गमावून बसले. यावरून या प्राण्याला एकांतवास किती प्रिय हेच दिसून येते. तिच्या या कृतीची चिकित्सा करत किमान शेवटच्या काळात तरी तिच्या अधिवासाभोवतालचे पर्यटन कमी करता आले असते. असे नियंत्रण देखरेख कर्मचाऱ्यांसाठी अनुकूल स्थिती निर्माण करत असते.मानवाचा वावर कमी झालेला दिसला की वाघही मुक्तपणे संचार करायला लागतो. त्याला न्याहाळण्याची प्रक्रिया अधिक बारकाव्याने राबवता येते व त्यानुसार सोयी उपलब्ध करून देता येतात. प्राण्यांच्या देखरेखीतले हे साधे तत्त्व. मात्र अलीकडे पर्यटन व त्यातून होणाऱ्या आर्थिक उलाढालीच्या नादात साऱ्यांनाच त्याचा विसर पडला आहे. अर्थकारणाच्या या लालसेतून वाटाडय़ा, हॉटेल्स व रिसॉर्टचे मालक आणि कर्मचारी अशी युतीच जन्माला आली आहे. त्यात भर पडते ती उत्साही पर्यटकांची. कुठेच वाघ दिसला नाही तर जा पांढरपवनीला 'माया' नक्की दर्शन देईल असे निरोप जन्म घेतात ते या युतीतून. मायाचे वय झाले, आता तिला त्रास देण्यात अर्थ नाही असा परोपकारी विचार मागे पडतो तो यातून.

# संविधानामुळे डॉ. बाबासाहेबांचा जगभर गाजावाजा

भारताच्या 'घटने'त (संविधान) काय नाही हे पाहण्यापूर्वी काय आहे हे पाहिले पाहिजे. आम्हाला लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक राज्य निर्माण करावयाचे होते. जाती, वंश, लिंग, धर्म वगैरेचा विचार न करता प्रत्येक व्यक्तिला राजकारणात समान हक्क द्यावयाचे होते. ते या 'घटने'त नाहीत असे कोण म्हणते ? प्रत्येक व्यक्ति राजकिय हक्काच्या बाबतीत समान आहे व तिला आपले संरक्षण केले जाण्याचा हक्क आहे असे जे म्हटले आहे त्याला घटने'त कोठेही बाधा आलेना नाही. प्रत्येक वयात झालेल्या स्त्री-पुरुषात मताचा हक्क आहे. समान संधी, समान नोकऱ्या, समान पगार मिळण्याची तरतूद घटनेत केली आहे. कोणतीही घटना (संविधान) परिणामक्षम होण्याकरता पुरेसा लवचिकपणा असावा लागतो राज्यावर संकटे आली म्हणजे सारी सत्ता मध्यवर्ती सत्तेला आपल्या हातात घेता आली पाहिजे. त्याशिवाय देशाचे रक्षण होत नाही. एखादा प्रांत बंडखोर झाला आणि त्याला तशी स्वायतता असली तर एका राज्यात दोन राज्ये निर्माण होऊ शकतील. ती देशविच्छेदनाची एक योजनाच होईल, ते या घटनेत टाळले आहे. त्याचप्रमाणे घटनेत काही इष्ट अपरिहार्य दुरुस्त्या कराव्या असे वाटले तर ते ही करण्याची व्यवस्था घटनेत आहे. अर्थात ही दुरुस्ती करणे तितके सोपे ठेवले नाही. १९५० साली अमलात आलेले भारतीय संविधान मुख्यत्वे १९३५ च्या भारत सरकार कायदा १९३५ वर आधारित आहे. १९३५ सालच्या या कायद्यान्वये भारताच्या अंतर्गत स्वशासनाचा पाया घातला गेला होता. ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट टली यांच्या शिष्टमंडळाच्या स्वतंत्र भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यासाठी एका मसुदा समितीच्या स्थापनेविषयीच्या कल्पनेस भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या नेत्यांनी सहमती दर्शविली होती. १९४६ च्या उन्हाळ्यात या समितीची स्थापना झाली व तिची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथील संविधान सभागृह मध्ये पार पडली की, जे आज सेंट्रल हॉल या नावाने परिचित आहे.पहिल्या बैठकीला ९ महिलांसह एकूण २०७ सदस्य उपस्थित होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतास स्वातंत्र्य मिळाल्यावर अल्पकाळ या समितीने भारताचे प्रतिनिधी रूपात काम केले होते. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसूदा समिती स्थापन झाली. अनेक बैठकांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारला गेला. यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली भारतीय राज्य घटनेत ३९५ कलमे व ८ परिशिष्ट्ये आहेत. आजच्या घडीला भारतीय घटनेत ४४८ कलमे, २५ भाग, १२ परिशिष्ट्ये, ५ पुरवण्या आहेत. भारतीय घटनेत वेळी प्रसंगी दुरुस्तीची तरतूद असल्यामुळे आतापर्यंत ९८ वेळा दुरुस्ती करण्यात आली आहे. म्हणून काही कलमे वाढली आहेत याची नोंद घ्यावी. ही घटना लिहिण्यासाठी दोन वर्षे अकरा महिने आणि सतरा दिवस लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांना सहा लोक सहकारी दिले होते.

परंतू, सहाही सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घटना लिहिण्यासाठी कसल्याही प्रकारे मदत केली नाही. त्यामुळे घटना लिहिण्याचे कार्य एकट्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना करावे लागले आणि त्यानंतरच भारतीय घटना दि. २६ नोव्हेंबर १९४९ ला घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांना सुपूर्द केली. ही भारतीय राज्य घटना दि. २६ जानेवारी १९५० रोजी या देशात अंमलात आली तेव्हापासुन देशात प्रजासत्ताक राज्य सुरु झाले. या भारतीय घटनेची विशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत. भारतीय राज्य घटना (संविधान) म्हणजे ज्या ग्रंथात देश कसा चालवावा या विषयी कायदे-कानुन आणि प्रत्येक घटकाचे अधिकार कर्तव्य इत्यादी गोष्टी ज्यामध्ये नमुद केले आहे त्याला (संविधान) भारतीय राज्य घटना म्हणतात. हा एक सामाजिक सिध्दान्त आहे. भारतीय घटनेने प्रत्येकाला जीवन जगण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. कोणतीही जात,लिंग, रुढी, परंपरा कोणत्याही व्यक्तीला त्याच्या जीवीत स्वातंत्र्याच्या आड येऊ शकणार नाही. जर तसा प्रयत्न केला तर




ती व्यक्ती किती मोठी असली किंवा मोठ्या पदावर असेल तरी त्या अन्याय अत्याचार करणार्या व्यक्तीला भारतीय घटनेने दोषी ठरविले आहे आणि त्याला शिक्षा करण्याची तरतूद आहे. भारतीय राज्य घटना कधी ताठर आहे तर कधी लवचिक आहे. वेळी प्रसंगी घटनेत नवीन कायदे समाविष्ट करण्याची तरतूद आहे देशात कधी आराजकता माजली तर आणीबाणी पुकारण्याची तरतूद घटनेत केलेली आहे. कारण अराजकतेमुळे देशाची वित्तहानी, प्राणहानी होते, जाळपोळ-दंगली घडतात. हे टाळण्यासाठी बंडखोर, चिथावणी घातक ठरणारी आंदोलने बंद करण्याची तरतूद घटनेत आहे. भारतीय राज्य घटनेमुळे हजारो वर्षाची धर्मावर आधारलेली विषम व अमानवी समाज व्यवस्था नष्ट केली व समता, स्वातंत्र्य बंधुता व न्याय या मानवतावादी तत्त्वावर आधारित समाजव्यवस्था या भारतात स्थापन झाली आहे. एवढी समाज बदलाची ताकद घटनेत आहे. भारतीय घटनेत स्त्री-पुरुष जातपात असा भेद न ठेवता सर्व व्यक्ती समाज आहेत हे भारतीय समाजाला भारतीय घटनेने शिकविले आहे. तसे कायदे व तरतूदी घटनेत समाविष्ट केल्या आहेत. आज भारतीय समाजाला व देशाला जगात आदर्श राज्य घटनेमुळे मान-सन्मान प्राप्त झाला आहे.

हा देश अमानवी वर्ण व्यवस्था जातीभेदामुळे जगात आपला देश बदनाम झाला होता. भारतीय राज्य घटना मानवी मुल्य जपणारी असल्याने आज जगाला मार्गदर्शन करीत आहे. या भारतीय घटनेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सारे जग कौतुक करीत आहे. जगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौध्दिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व मानवता या क्षेत्रात अग्रगण्य स्थान दिले आहे. भारतीय घटनेमुळे डॉ. बाबासाहेबांचे जातीयतेविरुध्दचे कार्य आधुनिक मानवाला विषमतावादी विचारांना समतावादी विचाराकडे नेणारा प्रबोधनाचा मार्ग बनले आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगाचे गुरु बनले आहेत. युग बदलणारा, समाज बदलणारा, जग बदलाची ताकद असणारा महामानव म्हणून त्यांना जगाने पूज्यनीय मानले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी हा देश अनेक छोट्या छोट्या राज्यात संस्थानांमध्ये विखूरलेला होता. या देशात अनेक जाती-जमाती होत्या, अनेक धर्म पंथांमध्ये हा देश विभागला होता. आपआपसात मतभेद होते. राज्य सिमावाद होता. या वातावरणात देशात एकता आणि अखंडता, बंधुता निर्माण करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटनेच्या माध्यमातून केलेले महान कार्य आहे. भारतात २९ घटक राज्ये, ७ केंद्रशासित प्रदेश आहेत. तसेच विविध जाती धर्माचे लोक रहात आहेत. या सर्वांमध्ये एकता निर्माण झाली ती केवळ भारतीय राज्य घटनेमुळे कलम १४ नुसार भारतातील सर्व व्यक्तीस समानतेचे संरक्षण देण्यात आले आहे. जातपात किंवा वर्ग, वर्ण असा भेदभाव केला जाणार नाही. कलम १६ प्रमाणे सार्वजनिक सेवा योजनांमध्ये समान संधी देण्यात आली आहे. कोणताही भेदभाव केला जाणार नाही. मुलभुत हक्काच्या बाबतीतही घटनेत व्यवस्था आहे मात्र राष्ट्र संकटात सापडले मगर कोणाही व्यक्तिला केवळ स्वातंत्रय दिले आहे व तो त्याचा दुरुपयोग करीत आहे असत वाटले तर ते स्वातंत्रय अबाधित राहणार नाही व्यक्तिला समानतेचे, धार्मिक आचार-विचार प्रचाराचे, शिक्षणच मिळण्याचे वगैरे हक्क दिले आहे. त्याचप्रमाणे व्यक्तीला पुरेशी जीवनाची साधने उपलब्ध व्हावती, संपत्तीची वाटणी समान व्हावी, सारख्या कामाकरता सारखा पगार मिळावा, लहान मुलांच्या व प्रौढांच्या प्रमाणे नागवणूक होऊ नये. प्रत्येकाला काम मिळण्याचा हक्क प्राप्त व्हावा, १४ वर्षापर्यंत प्रत्येकाला मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे, रोजगार धंद्याचे वातावरण चांगले असावे, रजेचा काळ त्याला चांगला उपभोगता यावा. त्याला सामाजिक व सांस्कृतिक संधी मिळाली. वगैरे बाबत सरकारने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. ही घटना सावधगिरी बाळगण्याच्या दृष्टिने जितकी सुदृढ करता येईल तितकी केली आहे. सध्याचा काळ सुरक्षितेचा नसल्यामुळे त्याला अनुसरुन ही घटना केली असल्यास ते दोषस्पद नाही. अशाप्रकारे तयार केलेल्या घटनेचे आपण स्वागत केल पाहिजे. या घटनेने दोष असलेच तर ते फाजील सावधगिरी बाळगण्याचे दोष आहेत. ते अपरिहार्य ही आहेत. त्यामुळे आपली वाढ, विकास किंवा प्रगती होण्यास कोणतीही अडचण येणार नाही. राजकारणात आपल्याला समता मिळाली आहे, पण सामाजिक व आर्थिक जीवनात राजकारणात दरडोई एकमत आणि एका मताचे एक मूल्य हे तत्व करीत आहो पण सामाजिक, आर्थिक जीवनात आपल्या विशिष्ट सामाजिक समाजरचनेमुळे, व्यक्ती मूल्याचे हे तत्वपूर्वी प्रमाणेच नाकारले जाणार आहे.

भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान देशाला अर्पण करण्याच्या एक दिवस आधीचे संविधान सभेतील शेवटचे भाषण. आपल्या भाषणात ते म्हणाले, मी या ठिकाणी घटनेच्या गुणवर्णनात शिरत नाही घटना कितीही चांगली व निर्दोष असली तरी ती जर अमलात आणणारे नालायक व निरुपयोगी असेल तर तीच घटना वाईट ठरेल. त्याचप्रमाणे घटना कितीही वाईट असली तरी ती राबवणारे चांगले असतील तर ती चांगली ठरेल. राज्यघटनेच्या स्वरुपावर तीची अंमलबजावणी अवलंबून असते. कायदेमंडळ, मंत्रीमंडळ, व न्यायधीश अशा सारखी राज्याची प्रमुख अंगे पुरविण्याचे काम राज्यघटना करीत असते. या राज्याच्या अंगाची अंमलबजावणी या घटकांवर अवलंबून असते ते घटक म्हणजे जनता व देशातील राजकिय पक्षोपक्ष हे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात स्वतंत्र्य भारताच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणाविषयी लोकशाही प्रधान राज्यघटनेच्या सुरक्षिततेविषयी आणि लोकशाहीच्या जोडीला स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व जीवनमुल्यांवर आधारित सामाजिक लोकशाहीला अत्यंत महत्वाचे स्थान देण्याविषयी जे बहुमुल्य विचार व्यक्त केले, ते मार्गदर्शन आहेत.

संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरुषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत. आयरीश देशभक्त डॅनियल ओकॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करुशकत नाही, कोणतीही स्त्री स्वत:च्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करुशकत नाही आणि कोणताही देश स्वत:च्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही. इतर देशांच्या तुलनेत भारताला सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही राजकारणात दिसणार नाही, इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अध:पतन आणि अंतिमत: हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो. आपल्या राष्ट्रातील श्रेष्ठ नेते व कायदेपंडीत यांनी उभारलेली घटनेली ही भव्य इमारत भारताच्याच काय, पण जगाच्या कौतूकाचा विषय झाल्याशिवाय राहणार नाही, हे ही तेवढेच खरे. संविधान गौरव दिनाच्या सर्वांना शुभेच्छा !

-------------

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# चला भारतीय संविधानाच रक्षण करूया..!

भारत जगभर धर्मनिरपेक्ष राज्य म्हणून ओळखला जातो .भारतात वेगवेगळ्या धर्मासाठी वेगवेगळे धर्मग्रंथ आहेत. जसे की हिंदूसाठी रामायण ,भागवत ,गीता मुस्लिमांसाठी कुराण सिखांसाठी गुरुग्रंथ साहेब ,बौद्ध धर्मियांसाठी त्रिपिटक, बुद्ध आणि त्याचा धम्म हे सर्व धर्मग्रंथ प्रत्येक धर्मियांना प्रिय आहेत याबद्दल हरकत नाही. परंतु इ. स. सन १९४७ मध्ये भारत इंग्रज राजवडीतून स्वातंत्र्य झाला .आणि २६ जानेवारी १९५० मध्ये सर्व भारतीय जनतेसाठी एकच राष्ट्रीय ग्रंथ म्हणजे भारतीय संविधानाचा स्वीकार करत भारताचे लोकशाही राष्ट्र निर्माण झाले. २६ जानेवारी १९५०पासून या देशात प्रत्येक माणसाला माणसातील भेदभाव करणारी विषमतावादी मनस्मृतीला नाकारून भारतीय संविधान लागू करण्यात आले. देशाचा राजा अर्थात पंतप्रधान राणीच्या पोटातून निवडणे ऐवजी मतपेटीतून निवडल्या जाऊ लागला. अनेक संघर्षानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटना मसुदा समितीचे अध्यक्ष झाल्यामुळे त्यांना अनेक प्रगतशील देशाच्या संविधानाचा रात्र दिवस सखोल अभ्यास करावा लागला. धार्मिक, सामाजिक ,राजकीय लढाई बरोबरच त्यांनी देशाची उत्तम राज्यघटना लिहिण्याचे काम यशस्वीरित्या पार पाडले. समता, स्वातंत्र्य ,बंधुभाव या त्रिसूचीचा अंगीकार करून विविध जाती, धर्म ,प्रांत ,भाषा अशा विशाल भारत देशाला भारतीय संविधान लिहून पुर्ण केल. हे महत्त्वपूर्ण काम करण्यासाठी त्यांना २ वर्ष ११महिने १७ दिवस लागले म्हणून त्यांना भारतीय संविधानाचे निर्माते शिल्पकार म्हटल्या जाते. भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता ,बंधुभाव या तत्त्वाचा अंगीकार केलेला आहे. संविधानाने सर्व देशातील जाती धर्मातील स्त्री-पुरुष यांना समातेची सन्मानाची आणि विकासाची सुवर्णसंधी दिलेली आहे. तसेच भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्ष हे तत्व प्रणाली स्वीकारलेली आहे . संविधानाने सर्व जाती-धर्मातील स्त्री-पुरुषांना शिक्षणाचा समान अधिकार दिला. म्हणूनच आज जुलमी धर्म समाज व्यवस्थेने नाकारलेल्या वंचितांना, स्त्रियांना वकील, डॉक्टर, शिक्षक, पंतप्रधान ,राष्ट्रपती, मुख्यमंत्री, आमदार, खासदार इत्यादी महत्त्वाच्या पदावर बसून पुरुषांबरोबर नेत्रदीप कामगिरी निभावत आहेत. आज रोजी भारतीय स्त्रियांची जी प्रगती आहे. ती फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानामुळेच आहे, हे विसरून चालणार नाही. भारतीय संविधानाने जाती-धर्माचा विचार न करता या देशातील अनेक देशद्रोही लोकांचे




कुटील डाव अनेकदा उघड केले आहे. म्हणून भारत देशातील अनेक प्रश्न हे बाबासाहेबांनी लिहलेल्या भारतीय संविधानाची योग्य ती अंमलबजावणी केल्यानेच सुटू शकतील याबद्दल शंका नाही. परंतु काही मनुवादी जातीवादी विचारसरणीचे लोक द्वेष भावनेतून भारतीय संविधान जाळत आहे ते बदलविण्याचाही घाट घालत आहे . हुकूमशाही वृत्तीने वागत आहे. बाबासाहेब म्हणायचे मी भारतीय संविधान कितीही चांगले लिहिले असले तरी चालवणारे मात्र मूर्ख असतील तर ते संविधान कुचकामी ठरेल ! आज तीच परिस्थिती अनेक प्रकरणावरून दिसून येते. अशा मनुवाद्यांचे हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी आंबेडकरी समूहासह सर्व भारतीयांनी दोन पावलं पुढं आलं पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय लोकांच्या राजकीय सामाजिक जीवनात रक्ताचा एक थेंबही न सांगता क्रांतिकारक बदल घडून आणला आणि तीच खरी भारतीय लोकशाही होय. अशा या महान भारतीय लोकशाहीचा भारतीय संविधान हाच खरा राष्ट्रीय ग्रंथ होय. हे देशातील तमाम संविधानवादी प्रेमी जनतेने संविधान टिकून ठेवण्यासाठी एकत्र येऊन मेरा देश मेरा प्यारा संविधान हा नारा अधिक जमाने बुलंद केला .पाहिजे हीच सविधान प्रेमी जनतेला कळकळीची विनंती करतो . आज २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा...

-------------------

लेखक ,पत्रकार - सिद्धार्थ तायडे मु. पो. वडनेर भोलजी
ता. नांदुरा
जि. बुलढाणा
मो. नं.९३०९७६७३८८

# महाराष्ट्राचे महत्त्व कमी केले, प्रगतीही मंदावली

कराड : महाराष्ट्रात दोनशे आमदारांचे सरकार स्थैर्य देऊ शकत नसून, राज्यात प्रचंड अस्वस्थता आहे. महाराष्ट्राचे महत्त्व कमी केले जात असून, प्रगतीचा वेग मंदावत असल्याची बाब चिंताजनक असल्याची टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.गृहमंत्र्यांचे काम त्या दर्जाचे दिसत नसल्याचे सांगत सुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त कराड येथील त्यांच्या समाधीस्थळी श्रद्धांजली वाहिल्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या. खासदार श्रीनिवास पाटील, आमदार बाळासाहेब पाटील आदी यावेळी उपस्थित होते.भाजपवर हल्लाबोल चढवताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, की पूर्वीची भाजप आता राहिली नसून, भ्रष्ट जुमला पार्टी बनली आहे. इन्कमटॅक्स, सीबीआय, ईडीच्या कारवाया केवळ महाराष्ट्रातच कशा होतात असा प्रश्न करून, महाराष्ट्राच्या खच्चीकरणासाठी केंद्रातील अदृश्य शक्ती सतत कार्यरत असल्याचा आरोप सुळे यांनी केला. मराठा आरक्षणावरून भुजबळ यांची वक्तव्ये समाजात



दंगली घडवणार आहेत का? असे विचारले असता, हो तसेच दिसतेय, असे सांगत मराठा, लिंगायत, धनगर आणि मुस्लिम समाजाची आरक्षणाची मागणी आहे. परंतु, त्याबाबत सरकार गंभीर नसल्याची टीकाही खासदार सुळे यांनी केली.


# दादासमोर नाक उचलून धाकुटी विचारे

पुणे : बारामती लोकसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणूक लढणार असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली होती. अशात बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांनी पक्षवाढीसाठी काय केले असे म्हणत काही दिवसांपूर्वी टीका केली. यावर आता अजित पवार गटातील रुपाली चाकणकर यांनी 'दादासमोर नाक उचलून धाकुटी विचारे' असे म्हणत कवीतेच्या रूपात उत्तर दिले आहे.दरम्यान, अजित पवार हे जेव्हा जुलै महिन्यात उपमुख्यमंत्री झाले तेव्हा खासदार सुनील तटकरे यांना अपात्र करण्याची मागणी आम्ही केली. यानंतर सुनील तटकरेंसह अजित पवार गटाकडून सुप्रिया सुळेंवर तुफान टीका सुरू झाली. सुप्रिया सुळे यांना सोशल मीडियावर ट्रोल करण्यात येत आहे.'तीन टर्म बारामती लोकसभा मतदारसंघात ज्यांच्या जिवावर निवडून येतात त्यांनाच विचारतात प्रश्न? दादासमोर नाक उचलून धाकुटी विचारे तू कुठे काय केलंस? चंदनाच्या खोडाला सहाण विचारे तू कुठं काय केलंस? तो झिजला, पण विझला नाही देहाची कुडीच विचारे तू कुठं काय केलंस? पाया भरला, विटा-वासे तोलून धरले घराचा उंबराच विचारे तू कुठं काय केलंस? नांगर धरला, शेती केली भुईला भीमेचं भान दिलं मुसक्यांची गाठ विचारे तू कुठं काय केलंस? घामाला दाम दिला कष्टाला मान दिला रक्ताचं पाणीच विचारे तू कुठं काय केलंस?' असे म्हणत सुळे यांच्या टीकेवर उत्तर दिले आहे.



# संविधानाचा स्विकार झाला पुढे काय..?

हजारो वर्षांपासून चालत आलेल्या विषमता, अन्याय, मानवी गुलामी व एकाच वर्षाच्या अधिपत्याखाली असलेली व्यवस्था उलथून टाकुन समता, न्याय, मानवी स्वातंत्र्य मिळवून देशाच्या प्रत्येक नागरिकास समान दर्जा, समान संधी निर्माण करून देऊन प्रत्येकाला देशाच्या राज्यकारभारात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी होण्याचा अधिकार बहाल करून माणवाच्या जिवनाचे कल्याण करणारे जगातील एकमेव आदर्श संविधान जगातील सर्वात विद्वान महापुरुष बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमाने, तब्येची काळजी न करता, देशातील कोणत्याही नागरिकांवर संविधानीक पद्धतीने अन्याय होणार नाही, एखादा ही घटक चुकुनही विकासासाठी दूर राहणार नाही याची काळजी घेऊन दोन वर्षे, अकरा महिने, अठरा दिवस संविधान लिहुन संविधान समीती समोर ते मांडून बऱ्याच लोकांनी विरोध करून बरेच मुद्दे जनकल्याणाचे आहेत हे आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर संविधान समितीला पटवून देऊन ते मान्य करून घेतले व आदर्श असे संविधान ज्या मध्ये देशाचा व देशातील जनतेचा सर्वांगीण काया पालट होईल अशी व्यवस्था निर्माण करणारे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान समीतीकडे सुपुर्द करून जनतेच्या वतीने संविधान समितीच्या सदस्यांनी आदर्श संविधानाचा स्विकार केला आणि जनतेला समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्याच्या माध्यमातून सोन्याचे दिवस जर संविधानाची अंमलबजावणी झाली तर येतील असे वक्तव्य तत्कालीन विद्वान लोकांनी केले होते. संविधानाचा स्विकार जनतेच्या वतीने त्यावेळच्या प्रतिनिधींनी केला परंतु आजही जनता संविधानाचा नैतिक पातळीवर स्विकार करून प्रचार आणि प्रसार करताना दिसत नाही हि खरी शोकांतिका आहे. अपवाद वगळता भारतीय लोक संविधानाचे वाचन करून समजून घेत नाहीत, स्वतः ला अभ्यासु व हुशार समजणाऱ्या लोकांनी जर संविधान वाचले नसेल, ते समजून घेतले नसेल, किंवा त्याच्या डोक्यात आजही एकच विचार असेल कि संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले व त्यामुळे एकाच जातीचा विकास झाला तर तो व्यक्ती देशातील सर्वात बुद्धीहीन व देशद्रोही व्यक्ती होय. कारण देशाचे संविधान समजून न घेता, त्याचा अभ्यास न करता आणि केवळ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले, आणि एकाच जातीसाठी लिहले असा पुर्वग्रह डोक्यात असलेल्या व्यक्ती राष्ट्रप्रेमी होऊच शकत नाही. संविधान न वाचणारा, संविधान घरात न आणणारा, व संविधान आणि संविधान निर्माते यांचे नाव घेताना कमीपणा वाटणारा व्यक्ती देशद्रोहीच आहे. मग तो स्वतः ला किती ही हुशार, विद्वान समजत असेल पण त्याची विद्वता शुन्य आहे. कारण ज्याला देशाचे संविधान व देशाचे उद्धारक कळत नसतील तर त्या व्यक्तीला बुद्धीचा पत्ताच नाही असे माझे वैयक्तिक मत आहे. संविधानाची उद्देशिका बघितली संविधानाची महती लक्षात येते परंतु ज्यांना वाचले कळत नाही त्यांना विद्वान म्हणणे म्हणजे स्वतः ही वैचारिक मागास असल्याचे सिद्ध होते. कारण उद्देशिके मध्येच स्पष्ट नमुद केले आहे. सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडवण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक- न्याय, विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा व उपासना चे- स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची - समानता निश्चित पणे प्राप्त करून देण्याचा, आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी- बंधुता, प्रवर्धित करण्याचा संकल्प पुर्वक निर्धार करून आमच्या संविधान सभेत तारखेसह अंगिकृत करण्याचे वचन देशातील जनतेला दिलेले आहे. याचाच अर्थ संविधाना पुर्वी देशात न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता नव्हती हे उघड होते. आणि संविधानाने आपल्याला एकसंघ करून सर्व काही मिळवून दिले. प्रत्येक नागरिकांना आवश्यक असलेले मुलभूत अधिकार बहाल करून त्यांच्या जिवनात वैचारिक व सामाजिक उर्जा भरण्याचे काम केले गेले. समानतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणाविरूद्धचा,धर्मस्वातंत्र्याचा व सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क देऊन त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी संविधानाने करून ठेवली आहे. ह्या मुळे जनतेला जगायला बळ मिळालेच परंतु जनतेचा खरा विकास हा संविधानाचा भाग चार यामुळे झाला आहे. भाग चार मध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश करून नागरिकांना सोन्याचे दिवस येतील अशी व्यवस्था केली आहे. सत्तेत असलेल्या लोकांना वेगळे असे काहीच करण्याची गरज नाही, किंवा सत्तेत बसलेल्या लोकांनी जनतेसाठी काही एखादी योजना सुरू करून विकासाच्या प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले तर ते सरकारचे उपकार नसुन सरकारची जबाबदारी आहे. आणि ते संविधानाचे उपकार आहेत हे विसरून चालणार नाही. शिक्षण देताना कोणताही भेदभाव न करता स्त्रि पुरूषांना शिक्षण घेण्याचा हा त्यांचा मुलभूत अधिकार आहे तो कोणीच बदलु शकत नाही. परंतु शिक्षणा नंतर किंवा काही घटक शिकलेला नाही तरीही त्या घटकासाठी सरकारने अर्धात संविधानीक शब्द म्हणजे राज्याने कलम ३९ (क) नुसार स्त्रि पुरुषांना रोजगाराची समान संधी उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. परंतु लोकांनी संविधान वाचले नाही म्हणून लोकांना संविधान कळाले नाही आणि राज्याकडे नैतिकता, प्रामाणिक पणा व जनकल्याणाचा विचार नसल्याने राज्य जनतेची लुट करत करते. जसे रोजगार हमी योजना हे कलम ३९ क चा परिणाम आहे. परंतु रोजगार हमी अर्ध्यात तुम्ही अर्ध्यात आम्ही आणि काही वर्षांपासून बऱ्याच भागातून ही योजना ही गायब झाली. परंतु लोकांना रोजगाराचे संसाधन व समान संधी उपलब्ध करून देण्याची नैतिक जबाबदारी राज्याची आहे. एखाद्या राज्याने एखाद्या कामाच्या ठिकाणी संधी निर्माण करून दिली असेल तर कलम ३९ (घ) नुसार राज्य पातळीवर समान कामाला समान वेतन देण्याची तरतुद ही केली आहे. मग ते काम शासकीय, निमशासकीय कोणत्याही पातळीवर असो. म्हणून शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांना समान कामासाठी समान वेतन व भत्ते दिले जातात त्या ठिकाणी कोणताही भेदभाव केला जात नाही. हे उपकार संविधानाचेच आहेत. कलम ३९ इ नुसार स्त्रि पुरुष यांच्या आरोग्य व ताकद याचा दुरूपयोग करता येणार नाही आणि बालकांच्या कोवळ्या वयाचा दुरूपयोग करता येणार नाही, म्हणजेच कोणत्याही कामाच्या ठिकाणी कोणत्याही स्त्रि पुरुष यांना अवघड, जड व जिवापेक्षा वरचड काम सांगता येणार नाही, आर्थिक परिस्थिती आणि कामाची गरज याचा गैरफायदा कोणालाही घेता येणार नाही म्हणून कामगारांना संरक्षण दिले. संविधानाचे कलम क्रमांक ४१ चा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की संविधानाने लहानातील लहान घटक सुद्धा दुर्लक्षित होऊ दिला नाही. कारण कलम ४१ नुसार कामाचा, शिक्षणाचा हक्क राखुन तर ठेवलाच आहे परंतु वृद्ध लोक, विकलांग, आणि अपराध नसताना एखाद्या व्यक्तीच्या वाट्याला हलाखिचे जिवन आले असेल तर त्यांना अर्थ साह्य करण्याची तरतूद संविधानामध्ये केलीली आहे. जनप्रतिनिधी अर्थात जनसेवकांना केवळ त्याची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. याच कलमाचा आधार घेऊन शैक्षणिक कार्यास हातभार लागावा म्हणून सारथी, महाज्योती सारख्या संस्था निर्माण करून ओबिसी व मराठा तरुणांना शिक्षणासाठी आर्थिक साह्य केले जाते हि संविधानाची देण आहे. वृद्ध व निराधार लोकांना दरमहा मासिक अर्थ साह्य, विकलांग व्यक्तीला व्यवसायासाठी आर्थिक साह्य, व त्यांना काही उपकरणे, मासिक आर्थिक साह्य जे काही मिळते ते कलम ४१ नुसार मिळते. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, वृद्ध व विकलांग लोकांना उदरनिर्वाहा साठी सरकार ला नवीन काहीच करायची गरज नाही फक्त संविधानात आहे तेच त्या गरजू लोकांना देण्याचे काम प्रामाणिकपणे करणे आवश्यक आहे. कलम ४३ नुसार राज्याने नागरिकांना पेन्शन ची व्यवस्था करून देण्यात यावी व काम करताना कामगारांना, कर्मचाऱ्यांना त्यांना त्यांचे जिवन जगताना सामाजिक व सांस्कृतिक जिवन जगता यावे अशा पद्धतीने कामाची व्यवस्था करावी अशी तरतुद करून दिली आहे. याचा अर्थ कामगारांना व कर्मचाऱ्यांना निर्वाह वेतन तर मिळायच पाहिजे परंतु दैनंदिन जिवन जगताना त्याचे जे सामाजिक व सांस्कृतिक जिवन आहे तेही जगता आले पाहिजे हे संविधानानेच करून दिले आहे. म्हणून काम करताना काही पगारी सुट्या ह्या शासकीय पातळीवर व काही पगारी सुट्या ह्या वैयक्तिक पातळीवर मिळतात हि संविधानाची देण आहे. दिवाळी, दसरा, इद, ख्रिसमस ला कर्मचाऱ्यांना सुट्टी देऊन त्यांना त्यांच्या संस्कृती ची जोपासना करण्याचा अधिकार संविधानाचे दिलेला आहे. एखाद्या वेळी एखाद्या कर्मचाऱ्यांना बायको सोबत फिरायला जाने, मित्र मैत्रिणीच्या लग्नाला जाणे, नातेवाईकांच्या सुख द:खाच्या कार्यक्रमात जाने यासाठी कर्मचारी पगारी सुट्टी घेऊन जातात. हे उपकार केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधानाचे आहेत. एवढे आदर्श संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्विकृत करून लोकांना सोन्याचे दिवस दिले. परंतु संविधानाचा स्विकार, संविधानाचे फायदे घेणारे लोक संविधाना प्रती संवेदनशील नसतील आणि संविधान न वाचता समजून घेत नसतील आणि संविधानाला एकाच जातीची संपती समजून आपल्या विद्वतेचे प्रदर्शन करत असतील तर यांना संविधान साक्षर करणे आवश्यक आहे. संविधानाचा स्विकारा सोबतच संविधानाचा प्रचार प्रसार करणे खुप आवश्यक आहे. म्हणून सर्वांनी एकजूट होऊन संविधानाची योग्य मांडणी करून संविधान राष्ट्रीय ग्रंथा सोबतच प्रत्येक नागरिकांच्या उद्धाराचे माध्यम आहे. याबद्दल जागृती करून संविधान मना मनात पोहचवण्यासाठी प्रयत्न केला तरच आपण खरे भारतीय आहोत. अशी ओळख निर्माण होईल. संविधानाच्या सर्वच लाभार्थ्यांना संविधान दिनाच्या मंगलमय सदिच्छा.




****************

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनच्या लेक माझी भाग्याची अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर :- रोटरी ही आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्था असून संपूर्ण जगामध्ये पोलिओ निर्मूलनाचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य या संस्थेने केले आहे. रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन तर्फे रोटरी वर्ष २०२३-२४ मध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२च्या प्रांतपाल रो. स्वाती हेरकल आणि सहाय्यक प्रांतपाल डॉ. बी. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन तर्फे लेक माझी भाग्याची अभियानांतर्गत लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र विभागात बाळाला नवीन कपडे आणि आईला प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. यावेळी रोटरी क्लब लातूर होरायझनचे अध्यक्ष रो. विश्वनाथ स्वामी (सावळे), सचिव रो. महादेव पांडे, प्रोजेक्ट चेअरमन माजी उपप्राचार्य प्रा. बी. एस. पणूरे, प्राचार्य डॉ. संजय गवई,



डॉ. गुणवंत बिरादार, युनिट इन्चार्ज डॉ. रामदास पांचाळ, लेखापाल आकाश वेदपाठक, अधिपरिचारिका संध्या साखरे, डॉ. चैत्राली शिंदे आणि डॉ. ऐश्वर्या भंडारी यांची उपस्थिती होती. यावेळी पुनम कदम (नादुर्गा), रूपाली कदम (ढाळेगाव), अंजली पवार (एकुर्गा), गीतांजली पोद्दार (शिराळा), अश्विनी वरवटे (आमसखेडा), अंजली भालेराव (आजनसोंडा), सुजाता जामकर (बाभळगाव), अन्वरबी पठाण (लातूर), दिव्या डोलारे (सोनचिंचोली), जरीना कोकासुरे (कासार शिरशी), कुसुम सुरवसे (लातूर), मीना जाधव (लातूर) आणि गायत्री किसे (हनुमंतवाडी) आदि महिलांना प्रमाणपत्र तर त्यांच्या बाळासाठी नवीन कपडे देण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. संजय गवई आणि प्रोजेक्ट चेअरमन माजी उपप्राचार्य प्रा. बी. एस. पणूरे यांनी मनोगते व्यक्त करून शासकीय रुग्णालयातील सर्व टीमचे मनः पूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गुणवंत बिरादार यांनी केले. तर प्रास्ताविक अध्यक्ष रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांनी केले आणि आभार रो. महादेव पांडे यांनी केले. या कार्यक्रमाला शासकीय रुग्णालयातील महिला, बालके आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथील स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. भाऊराव यादव, रशिदा मावशी आणि शाहीन मावशी यांनी सहकार्य केले.

# भाजपला फक्त १७ ते १८ टक्क्यांच्या पुढे मते

नागपूर : आमच्याकडे असलेल्या सर्वेक्षणानुसार भाजपची मते १७ ते १८ टक्क्यांच्या पुढे जात नाहीत. शिवसेनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसवर प्रयोग करण्यात आला. पण त्याचाही फायदा झालेला दिसत नाही. आता त्यांना भाजप चिन्हावर लढणे हाच अखेरचा पर्याय असेल, असा चिमटा विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी घेतला.वडेट्टीवार म्हणाले, हिंगोली येथे होणा-या ओबीसी मेळाव्यासाठी आपल्याला दोन दिवसांपासून कार्यकर्त्यांचे फोन येत आहेत. मला छगन भुजबळ यांचा कॉल आला. ओबीसी हक्कासाठी आपल्यात मतभेद दिसू नयेत असे त्यांनी सुचवले. त्यामुळे मी या मेळाव्याला जाणार आहे. हा सर्वपक्षीय मेळावा आहे. भुजबळ यांनी देखील ओबीसींसाठी राजीनामा देण्याची तयारी दर्शविली आहे. मी देखील ओबीसींसाठी लढण्याची तयारी केली आहे. आम्हाला कुणाचेही नुकसान करायचे नाही. ओबीसीला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे, हीच आमची भूमिका आहे.फाईल अडवा आणि एकमेकांची जिरवा - सरकारमधील तिघांची दिशा वेगळी आहे. दिल्लीने समजावून सांगितले तरी एकमेकांच्या समोर जात नाहीत.



# महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयातील बॅचलर ऑफ

लातूर : – येथील माईर पुणे संचलित महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयातील बॅचलर ऑफ फिजिओथेरपी (इ.झ.ढ्ह) पदवी अभ्यासक्रमाच्या २० विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढीस राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दि. २४ नोव्हेंबर २०२३ रोजी शासन निर्णय जारी करून मान्यता प्रदान केली आहे. सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षासाठी बी.पी.टीएच. पदवी अभ्यासक्रमास नव्याने मान्यता मिळालेल्या २० व पुर्वीच्या ४० अशा एकूण ६० जागांवर विज्ञान शाखेतून १२ वी (पी.सी.बी. ग्रुपसह) उत्तीर्ण, नीट परीक्षा पिअर व स्टेट सीईटी सेल येथे नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल, अशी माहिती कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी दिली.

महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालय हे वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित असून ४० प्रवेश क्षमतेसह बॅचलर ऑफ फिजिओथेरपी (इ.झ.ढ्ह) पदवी अभ्यासक्रमाचे नियमीत व दर्जेदार शिक्षण देणारे हे मराठवाड्यातील एकमेव महाविद्यालय आहे. सन २००५ पासून ते आद्यापपर्यंत या महाविद्यालयातील बॅचलर ऑफ फिजिओथेरपी पदवी अभ्यासक्रमाच्या १५ बॅचेस यशस्वीपणे बाहेर पडल्या असून आज अनेक पदवीधर फिजिओथेरपीस्ट म्हणून समाजासाठी चांगली सेवा देत आहेत. वैद्यकीय क्षेत्राला समांतर अशा फिजिओथेरपी क्षेत्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले असून फिजिओथेरपी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा ओढा वाढला आहे. परिणामी या शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाचे मेरिट वर जात आहे. त्यामुळे उपलब्ध जागा प्रवेशासाठी कमी पडत आहेत. ही परिस्थिती लक्षात घेवून कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयातील बॅचलर ऑफ फिजिओथेरपी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमता वाढीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. त्यास सक्षमता तपासणी आधारे राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने मंजूरी देऊन २० विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढीसाठी मान्यता प्रदान केली आहे. त्यामुळे चालु शैक्षणिक वर्षात फिजिओथेरपी पदवी अभ्यासक्रमासाठी पुर्वीच्या ४० व वाढीव २० अशा एकूण ६० जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. शासनाने ठरवून दिलेल्या जात प्रवर्गनिहाय या अभ्यासक्रमास प्रवेश दिले जाणार असून एकूण प्रवेशापैकी ८५ टक्के प्रवेश हे सामान्य कोट्यातून तर १५ टक्के प्रवेश हे संस्थेच्या व्यवस्थापन कोट्यातून दिले जाणार आहेत. प्रवेशीत विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे प्रवर्ग निहाय शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (उशीं उशश्रश्र) बॅचलर ऑफ फिजिओथेरपी (इ.झ.ढ्ह) पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३० नोव्हेंबर पर्यंत मुदत दिलेली आहे. त्यानुसार सन २०२३–२४ यावर्षी प्रवेश घेण्यास इच्छुक असलेले मात्र यापुर्वी मेरिट वर गेल्यामुळे संधी हुकलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयास मिळालेल्या वाढीव २० प्रवेश क्षमतेमुळे फिजिओथेरपिस्ट होण्याची संधी उपलब्ध झालेली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सीईटी सेल व सक्षम प्राधिकरणाकडे मागणी केल्यास त्यांना प्रवेशासाठी काही दिवसाची वाढीव तारीख मिळून याच वर्षी प्रवेश मिळू शकतात. तरी प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ारहरलशीं. ीस या वेबसाईटवर जावून ठरवून दिल्याप्रमाणे सर्व ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण करावी व अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या मो. ९४२२७१०९९०, ०२३८२–२२८१३५ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड व प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी केले आहे.



ीं फिजिओथेरपी क्षेत्रात तरुणांना करिअर घडवण्याची संधी

फिजिओथेरपी क्षेत्रात रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध असून त्यासाठी लागणारी शैक्षणीक पात्रता व अनुभव असणाऱ्यांना स्वताचे करिअर घडविण्याची संधी उपलब्ध आहे. फिजिओथेरपिस्ट होण्याकरीता मर्यादीत ठिकाणी मार्गदर्शन उपलब्ध असून महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाने बी.पी.टीएच. पदवी अभ्यासक्रमांची सुरुवात करुन या क्षेत्रातील करिअरचे दालन उघडे केले आहे. या क्षेत्रात येवू पाहाणाऱ्या तरुणांना पदवी प्राप्त केल्यानंतर फिजिओथेरपिस्ट म्हणून स्वतंत्रपणे व्यवसाय सुरू करता येईल. याशिवाय विविध शासकीय आणि खाजगी रूग्णालये, आरोग्य केंद्र, कार्पोरेट रूग्णालये, शुश्रुषागृहे, कॉर्पोरेट हाऊसेस, क्रीडा प्राधिकरणे, वृध्दाश्रम, अपंग शाळा यामध्ये करिअरची संधी उपलब्ध आहे. शिवाय बी.पी. टीएच. पदवीधारक पदवी नंतरच्या सर्व स्पर्धा परिक्षांसाठी पात्र असणार आहेत, अशी माहिती डॉ. हनुमंत कराड यांनी दिली.

## नाशिक, नगरच्या धरणांतून जायकवाडीत सोडले पाणी

नाशिक/नगर : प्रतिनिधी

बराच वाद आणि गोंधळानंतर अखेर नाशिकमधील धरणांमधून जायकवाडीत पाणी सोडण्यास जिल्हा प्रशासनाने सुरुवात केली. शुक्रवारी रात्री ११ च्या सुमारास दारणा धरणातून १०० क्यूसेकने विसर्ग करण्यात आला. मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या पथकाच्या उपस्थितीत पाणी सोडण्यात आले. याबरोबरच नगर जिल्ह्यातील मुळा, प्रवरा धरणातूनही पाणी सोडण्यात आले. त्यामुळे जायकवाडीच्या दिशेने पाणी प्रवाहित झाले आहे. ४८ तासांत हे पाणी जायकवाडीत पोहोचणार आहे.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने जायकवाडीसाठी ८.६ टीएमसी इतके पाणी सोडण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर याला झालेला विरोध आणि न्यायालयीन लढाईनंतर अखेर प्रत्यक्षात पाणी सोडण्याची कार्यवाही सुरू झाली. मराठवाड्यात यंदा अपेक्षित पाऊस झाला नसल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. याच पार्श्वभूमीवर समन्वय पाणी वाटप कायद्यानुसार अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील धरणातून पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर झालेल्या प्रशासनाच्या बैठकीत वरील धरणातून जायकवाडीत ८.६०३ टीएमसी पाणी सोडण्याचा निर्णय झाला.

नाशिक, नगर जिल्ह्यातील गंगापूर, गोदावरी–दारणा, मुळा, प्रवरा, निळवंडे धरणातून हे पाणी सोडले जाणार आहे. या धरणांतून हळूहळू विसर्ग करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे पाणी सोडण्याची प्रक्रिया अशीच सुरू राहणार असून, या माध्यमातून ८.६०३ टीएमसी पाणी सोडण्यात येणार आहे. मात्र, प्रत्यक्षात ५ टीएमसीच पाणी जायकवाडी धरणात येणार आहे.

### विविध धरणांतून या प्रमाणात सुटणार पाणी

शासन आदेशानुसार मुळा (मांडओहोळ व मुळा) प्रकल्पातून २.१०, प्रवरा (भंडारदरा, निळवंडे, आढळा, भोजापूर) प्रकल्पातून ३.३६, गंगापूर धरणातून (गोदावरी, काश्यपी, गौतमी गोदावरी) ०.५, गोदावरी दारणा (आळंदी, कडवा, भाम, भावली, वाकी, दारणा, मुकणे, वालदेवी) प्रकल्पातून २.६४३ टीएमसी असे एकूण ८.६०३ टीएमसी पाणी जायकवाडीत सोडण्यात येणार आहे.

### ३५ टक्के पाणी वाया जाणार

नाशिक आणि नगर जिल्ह्यातील धरणांतून ८.६०३ टीएमसी पाणी जायकवाडीत सोडण्यात येणार आहे.

# मौजे किनी (कदु) येथे बसवसृष्टी परिसरातील संविधान पार्कचे उद्घाटन

अहमदपूर :– मौजे किनी (कदु) तालुका अहमदपूर,जिल्हा – लातूर येथे मोघा रोडवर मोघा धरणाच्या काठी निसर्ग रम्य परिसरात बसवसृष्टी चे निर्माण केले जात आहे. तेथे बाराव्या शतकातील महान समाजसुधारक महात्मा बसवण्णा चा ११ फुटी पुतळा शांतिभवणगुहा शरण भवन, वचन वन, वचन स्तंभ,अक्कमहादेवी पुतळा,शरणग्राम, वनराई,महाद्वार,पर्यटक निवास, दासोहभवन अनुभव मंटप,ग्रंथालय म्युझिअम इत्यादी निर्मिती बसवसृष्टी येथे केले जाणार आहे. पर्यावन संवर्धनासाठी ४०० वृक्षाचे संवर्धन करून ऑक्सिजन झोनची निर्मिती करण्यात आली आहे. तेथे सध्या भव्य सभागृह,दासोह भवन याची निर्मिती केली आहे . २६ नोव्हेंबर हा भारतीय संविधान दिन असून त्या दिनाचे औचित्य साधून भारतीय संविधान साक्षरता अभियान राबविले जाणार आहे. त्या उपक्रमातर्गत बसवसृष्टीत संविधान पार्क ची निर्मिती करण्यात आली आहे तेथेतक्षशिला नालंदा नामकरणाची भव्य कमान व भारतीय संविधानाचा इतिहास, महत्त्व व संविधानातील सरनामा, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य,जल जंगल व पर्यावरण संवर्धन संदेश फलक, महामवाचे विचार फलक इत्यादी मूलभूत माहिती पर्यटकांना दिली जाणार आहे निरोगी भारत,स्वच्छ भारत समृध्य भारत व आखंड भारतासाठी भारतीय संविधान आज ही सक्षम आहे.म्हणून भारतीय संविधान पार्क ची उभारणी बसवसृष्टीत केली गेली आहे व भारतीय संविधान विचाराचा जनसागर बसवसृष्टीत केला जाणार आहे हा परिसर 'लँड ऑफ डेमॉक्रॅसी व स्टॅच्यू ऑफ इक्वॅलिटी' चा संदेश देत राहणार आहे अश्या या बसवसृष्टीतील संविधान पार्क चे उद्घाटन मा. आ. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते संविधान दिनानिमित्त दि. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी ४ वाजता संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या संविधान पार्क चा उद्घाटन सोहळ्यासाठी बसवसृष्टी परिसरात दी २७ नोव्हेंबर सायंकाळी ४ वाजता उपस्थित राहण्याचे आव्हान बसवसृष्टी चे निर्माते डॉ.भीमराव पाटील,शिवदास पाटील, रमाकांत पाटील, उमाकांत पाटील, आर आर पाटील, व्यंकटराव तुडमे, विठ्ठलराव गुडमे, प्रा व्यंकटेश पाटील, दता गिरी,कोंडीबा हारगिले, राहूल सोनकांबळे संजय पाटील, संग्राम पाटील, बालाजी विठ्ठल भुरे, शिवप्रसाद पाटील, मारोती हिप्पळगावे,परमेश्वरभुरे,विश्वांभर मटके राहूल शेंबाळे राजेश्वर भुरे, विलास भुरे, दिलीप सावरगावे,ज्ञानेश्वर तुडमे,विशाल कोकाटे,शिवाजी भुरे,भास्कर भुरे,राजेंद्र भुरे विलास शेंबाळे, माधव हारगिले, विश्वनाथ तुडमे, मल्लिकार्जुन हिप्पळगावे, संतोष तरगुडे, यांनी केले आहे.



# भारतीय संविधानाचे संवर्धन करण्याचे दायित्व प्रत्येक भारतीयाचे आहे ! – ॲड. राजेंद्र लातूरकर यांचे प्रतिपादन

लातूर ( प्रतिनिधी) : भारतीय संविधान हे जगातील लोकशाहीवादी राष्ट्रांच्या संविधानाहून अधिक बृहद स्वरूपाचे असून ते देशहिताबरोबर देशातील समग्र भारतीय नागरिकांची मानवी मूल्ये अबाधित ठेवून त्यांची प्रतिष्ठा वृद्धिंगत करणारे आहे. मानवाधिकाराची सनद ठरलेल्या भारतीय संविधानाचे जतन व संवर्धन करण्याचे दायित्व प्रत्येक भारतीयाचे आहे , असे ड. राजेंद्र लातूरकर यांनी प्रतिपादन केले . जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग , लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालयातील पुष्पवाटिकेत संविधान दिनाच्या (२६ नोव्हेंबर )पूर्वसंध्येला आयोजिण्यात आलेल्या जाहीर समारंभात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. सुरेखा कोसमकर या उपस्थित होत्या . विचारमंचावर मा. न्या. एस. एन. भोसले( दिवाणी न्यायाधीश( वरिष्ठ स्तर) तथा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी सचिव ), मा. न्या. आर. बी. रोटे( जिल्हा व्यायाधीश, लातूर) (महाराष्ट्र व गोवा वकील मंडळाचे पदसिद्ध सदस्य ड. अण्णाराव पाटील, जिल्हा सरकारी वकील मा. संतोष देशपांडे , लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. महेश बामणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

संविधान गौरव समारंभाच्या आरंभी संविधानाचे शिल्पकार तथा घटनापंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस मंचावरील मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान राष्ट्राला सुपूर्द करताना २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संसदेत केलेल्या ऐतिहासिक भाषणाची पुस्तिका देऊन मंचावरील अतिथींचे स्वागत करण्यात आले.



आपल्या भाषणात पुढे बोलताना ड. राजेंद्र लातूरकर म्हणाले की, आपला देश शतावधी वर्षे ब्रिटिशांच्या दास्यशृंखलेत जखडून गेला होता. आपल्या पूर्वज पिढीतील असंख्य क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन देशाला पारतंत्र्यमुक्त केले. गतेतिहासातील फंदफितुरी करणा–या दुष्प्रवृत्तींमुळेच देशाचे स्वातंत्र्य आपल्यापासून हिरावले गेले . महत्प्रयासाने नि एकसंध रीतीने ब्रिटिश सत्ताधीशांविरुद्ध प्रखर लढा देऊन आपला देश स्वतंत्र झाला . देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्याला मोठी किंमत मोजावी लागली आहे . असीम त्याग आणि प्राणांची आहुती देऊन मिळविलेले हे स्वातंत्र्य आणि मानवी मूल्यांची प्रतिष्ठा वृद्धिंगत करणा– या भारतीय संविधानाचे सर्वशक्तिनिशी जतन व संवर्धन करण्याचे दायित्व प्रत्येक भारतीयाचे आहे ,असेही ते आपल्या भाषणात म्हणाले. जिल्हा न्यायालयात आयोजिण्यात आलेल्या संविधान गौरव समारंभाला न्यायालयातील न्यायाधीशवृंद, विधीज्ञवृंद, न्यायालयातील प्रशासकीय अधिकारी , डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे सर्व सदस्य, माध्यम प्रतिनिधी , पत्रकार , निमंत्रित, न्यायालयीन कामकाजानिमित्त आलेले पक्षकार यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हा संविधान गौरव समारंभ यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे सदस्य एड. जांबुवंतराव सोनकवडे, एड. शिवकुमार बनसोडे, एड. भारत ननवरे, एड. सचिन कांबळे , एड. प्रशांत गायकवाड , विधी सेवा प्राधिकरण व न्यायालयातील कर्मचारी आदींनी विशेष परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अनुक्रमे अज. शिवकुमार बनसोडे व एड. सचिन कांबळे यांनी केले . एड. भारत ननवरे यांच्या आभारप्रदर्शनानंतर समारंभाची सांगता झाली .

# कामासाठी गांव सोडा आणि मोठे व्हा– आमदार बाबासाहेबजी पाटील.

अहमदपूर :– महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या वतीने २३ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रियदर्शनी विद्यालय,टेंभुर्णी रोड अहमदपूर जिल्हा लातूर येथे इमारत बांधकाम कामगारांना सुरक्षा किट वाटप आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अहमदपूर –चाकूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते इमारत बांधकाम कामगारांना सुरक्षा किट वाटप करण्यात आले.यावेळी कामगार नेते सागर तायडे अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना मुंबई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजीराव देशमुख तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हे होते,माधवराव जाधव,जिल्हापरिषद सदस्य,टी एन.कांबळे सभापती समाज कल्याण,प्रशांत भोसले जिल्हा अध्यक्ष रा.काँग्रेस,निवृत्ती कांबळे उपाध्यक्ष महेश अर्बन बँक,शिवाजीराव खांडेकर सभापती पंचायत समिती अहमदपूर,दयानंद पाटील युवा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस,भगवानराव ससाणे तालुका सरचिटणीस राष्ट्रवादी,अभय मिरकले नगरसेवक अहमदपूर,कालिदास रोटे राज्य संपर्क प्रमुख सत्यशोधक कामगार संघटना,मान.रानोजी हिवरे कार्याध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना परभणी, मान.गंगाधर ताडमे सरपंच सय्यद्पूर,मान. अशोक सोनकांबळे शहर उपाध्यक्ष मान.धर्मपालजी गायकवाड,मान.एन.डी राठोड, इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत ५५० इमारत बांधकाम कामगारांना सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले.आरोग्य तपासणी शिबिराच्या डॉक्टरांचा शाल,पुष्पहार देऊन आमदार बाबासाहेब पाटील यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.त्यावेळी आमदार बाबासाहेब पाटील बोलत होते. तसेच त्यांनी लातूरचे सहाय्यक कामगार आयुक्त मंगेशजी झोले यांचे विशेष आभार व्यक्त केले. कायमस्वरूपी काम पाहिजे असेल तर अहमदपूर चाकूर,शिरूर सोडून जावे लागेल.त्यावेळीच चांगली नोकरी मिळेल आणि पैसा मिळवता येईल.आज आपल्या कारखान्यात बिहार,झारखंड,उत्तराखंड येथून कामगार येऊन काम शिकून घेऊन कारागीर म्हणून चांगले काम करून पैसा मिळवतात. त्यांच्या कडून आपण काही तरी शिकलो पाहिजे.तरच आपण पुढे भविष्यात प्रगती करू शकतो.असे आमदार बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या २८ योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्व कामगारांनी संघटीत होऊन नांव नोंदणी करून घ्यावी कोणती ही अडचण आली तर मी व आपले कार्यकर्ते आपल्या साठी सैद्रय हजर आहे. असे आमदार बाबासाहेब पाटील यांनी जाहीरपणे कामगारंना आवाहन केले.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या वतीने इमारत बांधकाम कामगारांना सुरक्षा किट वाटप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या वतीने इमारत बांधकाम कामगारांना सुरक्षा किट वाटप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लातूरचे सहाय्यक कामगार आयुक्त मंगेशजी झोले यांचे विशेष मार्गदर्शन लाभले त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.इमारत बांधकाम कामगारांना सुरक्षा किट वाटप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूर्यकांत कोकाटे, बालाजी कोकाटे,राहुल तलवार,भगवान ससाने,गोविंदराज लहूबंदे,बालाजी सूर्यवंशी आजय बोडके,भगवान दुर्गे,सागरबाई काकरे,विद्या गायकवाड,दत्तात्रेय गायकवाड,दगडू ढवळे व्यंकटेश इरबतनवाड, अंकुश कांबळे यांनी विशेष मेहनत घेतली. सुभाष साबळे यांनी उतम प्रकारे सूत्रसंचालन केले आणि भगवान ससाणे यांनी सर्वांचे आभार मानले.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE